# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- ६१-२३ दिनांक :- २२/०२/२०२३

## लहान मुलीचे अपहरण करणा-या आरोपीतास बिहार राज्यातुन अटक करुन पिडीत मुलीची सुटका आचोळे पोलीस ठाणे व गुन्हे शाखा यांची संयुक्त कामगिरी.

दिनांक १५/०२/२०२३ रोजी १६.३० वा चे सुमारास फिर्यादी यांची मुलगी वय ०१ वर्ष ही त्यांचे राहते घराचे बाहेर खेळत असताना सदर परिसरात राहणारा आरोपी नामे सुमेंद्रकुमार सुकलदास मंडल याने तिचे अज्ञानाचा फायदा घेवुन पळवुन नेले बाबत आचोळे पोलीस ठाणेस फिर्याद दिल्याने आचोळे पोलीस ठाणे गुन्हा.रजि.नं. १०२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३६३ प्रमाणे दिनांक १६/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अपहरीत मुलगी ही एक वर्षाची असल्याने सदर घटनेचे गांभीर्य लक्ष्यात घेवून अपहरीत मुलगी व आरोपी याचा तात्काळ शोध घेवुन सदरचा गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी गुन्हे शाखा मि.भा.व.वि. आयुक्तालय तसेच आचोळे पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या होत्या. सदर सुचनेप्रमाणे वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली होती. नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने तांत्रिक विश्लेषणाद्वारे कौशल्यापुर्ण तपास करुन आरोपीत नामे सुमेंद्रकुमार सुकलदास मंडल यास अपहरीत मुलीसह ग्राम टिलकमाजी, जि. बागलपुर राज्य बिहार येथुन ताब्यात घेण्यात आले व त्यास दिनांक २१/०२/२०२३ रोजी अटक करुन पिडीत लहान मुलीस सुखरुप तिच्या आई-वडीलांच्या ताब्यात देण्यात आले. नमुद गुन्हयाचा तपास स.पो.नि. संदेश पांलाडे नेम आचोळे पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ अति. कार्यभार परिमंडळ २, श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, श्री. चंद्रकांत सरोदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, पो.नि. श्री. सुधिर गवळी (गुन्हे), श्री. राहुल राख, मध्यवर्ती गुन्हे शाखा कक्ष, श्री. शाहुराज रणवरे, गुन्हे शाखा कक्ष २ वसई, श्री. प्रविण बडाख, गुन्हे शाखा कक्ष ३, विरार चे अधिकारी व अंमलदार तसेच आचोळे पोलीस ठाण्याचे स.पो.नि. संदेश पालांडे, यशपाल सुर्यवंशी, पो.उप.नि. नलावडे, लोंढे, सुहास म्हात्रे, स.फौ. राजेश काळपुंड, पो.हवा. दत्तात्रय दाईंगडे, प्रशांत सावदेकर, सुनिल पाटील, पारधी, पो.अंम. बालाजी संगमे, विनायक कचरे, बडगुजर यांनी केली आहे.

---------ooo--------